केंद्र पुरस्कृत योजनांचे निधी वितरण व विनियोग व्यवस्थापन (PFMS) करीता Single Nodal Agency (SNA) व Nodal Officer यांची नियुक्ती करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,
शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२०२६/प्र.क्र.४५/प्रशा-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२६.

वाचा :- १. भारत सरकार, वित्त मंत्रालय यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. F.No.१ (१३)/PFMS/ FCD / २०२०, दिनांक २३ मार्च, २०२१.

२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३५/कोषा प्रशा-४, दिनांक १ जुलै, २०२१.

३. कौशल्य, रोजगार ,उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२१/प्र.क्र.३२/ प्रशा-३, दिनांक १३ जुलै, २०२१.

४. कौशल्य, रोजगार ,उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२१/प्र.क्र.३२/ प्रशा-३, दिनांक २८ फ़ेब्रुवारी, २०२२.

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधीचे परिणामकारक व्यवस्थापन करणे तसेच निधी विनियोगाच्या प्रक्रियेत अधिक परिणामकारकता आणण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने संदर्भाधिन दिनांक २३ मार्च, २०२० रोजीच्या आदेशान्वये सुधारीत कार्यपध्दतीचा अवलंब करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीसाठी एका Single Nodal Agency (SNA) नेमणूक करुन त्या योजनेसाठी प्राधिकृत बँकेमध्ये स्वतंत्र Single Bank Account उघडणे आवश्यक आहे. तसेच सदर केंद्र पुरस्कृत योजनांच्या समन्वयाच्या दृष्टीने किमान उप सचिव दर्जाच्या अधिका-याची Nodal Officer म्हणून नियुक्ती करण्याबाबन निर्देशित केले आहे. त्यानुसार संदर्भाधीन क्र.३ व ४ येथील शासन निर्णय अन्वये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अंतर्गत केंद्र पुरस्कृत योजनांकरीता Single Nodal Agency व Nodal Officer ची नियुक्ती करण्यात आली होती. तथापि सद्यस्थितीत Nodal Officer श्री. रविंद्र मठपती यांची महसूल विभागाच्या दि. ११/०८/२०२६ च्या कार्यालयीन आदेशान्वये बदली झाल्यामुळे त्यांच्या रिक्त जागी सहसचिव/उपसचिव (अर्थसंकल्प) यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनुसार कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गतच्या केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमजबजावणी साठी पुढील प्रमाणे Single Nodal Agency आणि Nodal Officer नियुक्ती करण्यात येत आहे:-

अ. क्र.	विभागाचे नाव	Single Nodal Agency
१.	कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, नवी मुंबई.	आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय
२.	महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.	मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी
३.	व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई.	संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

२. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गतच्या केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमजबजावणीसाठी सहसचिव/उपसचिव (अर्थसंकल्प) यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

३. त्यामुळे वरीलप्रमाणे नियुक्त Single Nodal Agency (SNA) यांनी केंद्र पुरस्कृत योजनांचे निधी वितरण व विनियोग व्यवस्थापन (PFMS) बाबत वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.२ येथील परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६१११७१८१०३७८७०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

PRADNYA SHYAM MESHRAM

Digitally signed by PRADNYA SHYAM MESHRAM
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=327F48FC91004AD3EF5A6EBC89E6964B30682A841A4EE2D95624FCA82A93AB47, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=226F0D033488A1C546030C101D31C947F7247A2CB501F8CAFEB198EF7E26E956, cn=PRADNYA SHYAM MESHRAM
Date: 2026.11.17 18:11:40 +05'30'

(प्रज्ञा मेश्राम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
२. आयुक्तालय, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई.

३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
५. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
६. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
७. वित्त विभाग (व्यय-६/ अर्थसंकल्प-१८/कोषा प्रशा-४/एसएनए-स्पर्श) मंत्रालय, मुंबई-३२.
८. नियोजन विभाग (कार्यासन १४७१), मंत्रालय, मुंबई-३२.
९. सर्व उपसचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. निवडनस्ती/प्रशा-३.